प्रकरण सहावे

# 'लोकसखा ज्ञानेश्वर' कादंबरीचे अभिव्यक्ती विशेष

प्रकरण सहावे

# 'लोकसखा ज्ञानेश्वर' कादंबरीचे अभिव्यक्ती विशेष


६.१ प्रस्तावना

६.२ कथानक

६.३ व्यक्तिरेखन

६.४ समाजचित्रण

६.५ भाषाशैली

६.६ निवेदन शैली

६.७ समारोप

संदर्भ

## प्रकरण सहावे

# 'लोकसखा ज्ञानेश्वर' कादंबरीचे अभिव्यक्ती विशेष

### ६.१ प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणामध्ये 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीतील अभिव्यक्ती विशेषांचा अभ्यास करावयाचा आहे. यामध्ये सदर कादंबरीचे कथानक, व्यक्तिरेखा, समाजचित्रण, निवेदन शैली, भाषाशैली, प्रतिमा, संवाद, म्हणी व वाक्यप्रचार, अभंग, ओवी इत्यादी बाबींच्या अनुषंगाने या कादंबरीचे अभिव्यक्ती विशेष लक्षात घ्यावयाचे आहेत.

### ६.२ कथानक :

''एक बाह्य मुहूर्तावर विधिपूर्वक गुरूच्या हातून विठ्ठलाला शेवटचं स्नान घडलं''[१] अशी या कादंबरीच्या कथानकाची सुरुवात होते. विठ्ठलपंत हे आपेगावचे असून त्यांने पैठण विद्यापीठाच्या पाठशाळेत आपले विद्यार्जन पूर्ण केले आणि ते आपल्या गावी आपेगावला आले. तेव्हा त्यांच्या आई-वडिलांना खूप आनंद झाला. तसेच त्यांनी त्यांचा विवाह करण्याचे ठरविले, पण त्यांने आपण दीड एक वर्षे विवाह करणार नसल्याचे सांगून तो उत्तरेस देशाटनास गेला.

विठ्ठलपंत देशाटन पूर्ण करुन आळंदीतील सिद्धबेटावर आल्यावर तेथे त्यांना आळंदीचे सिद्धोपंत कुलकर्णी हे भेटतात आणि त्यांची त्यांच्याशी ओळख झाल्यावर त्यांच्या घरी ते भोजनास जातात. घरी आल्यावर सिद्धोपंताची पत्नी उमाबाई व कन्या रुक्मिणी या त्यांचे स्वागत करतात. त्यानंतर तेथे भोजनाचा कार्यक्रम झाल्यावर त्यांनी विठ्ठलपंतांची व त्यांच्या आई-वडिलांची सर्व चौकशी केली. तसेच ते त्यांच्या वाड्यात सात-आठ दिवस राहिल्यावर त्यांचा स्वभाव सिद्धोपंताच्या घरातील सर्व मंडळीना आवडला.

पुढे काही दिवसांनी सिद्धोपंतानी त्यांना रुक्मिणीबरोबर विवाह करण्यासंबंधी विचारले. तेव्हा त्यांने तिच्याशी विवाह करण्यास अनुमती दिली. त्यानंतर त्यांच्या विवाहाचा दिवस व मुहूर्त निश्चित झाल्यावर आळंदी येथे मोठ्या थाटात त्यांचा विवाह सोहळा पार पडला. पण विठ्ठलपंताची विवाहास आपल्या आई-वडिलांना बोलविले नसल्याने त्यांना

खूप दु:ख वाटत होते. म्हणून ते विवाहानंतर आपल्या पत्नीस व सासू-सासऱ्यास घेऊन आपेगावला आपल्या आई-वडिलांना भेटण्यास गेले. तेव्हा त्यांच्या आई वडिलांनी या सर्व मंडळीचे स्वागत आनंदाने केले.

विठ्ठलपंताच्या विवाह होऊन सात-आठ वर्षे झाली होती. पण त्यांना अपत्यप्राप्ती नसल्याने त्यांच्या आई-वडिलांना खूप दु:ख वाटत होते. तसेच नातवंडाची वाट पाहून त्यांचे वडील स्वर्गवासी झाले होते. त्यानंतर पुढे विठ्ठल-रुक्मिणी आळंदीस राहण्यास आले. तेथे त्या दोघांनीही अपत्य प्राप्तीसाठी अनेक उपास, तापास, व्रत-वैकल्ये, औषधोपचार इत्यादी केले. पण हे सर्व उपाय करुनही अपत्य संभव नसल्याने त्यांनी संन्यास घेण्याचा निर्णय घेतला. तसेच त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी आपल्या सासऱ्यास एक पत्र लिहून ठेवले आणि घरातील सर्व मंडळीना आपण पंढरीस जात असल्याचे सांगून ते काशी-वाराणशीला संन्यास घेण्यास घरातून निघून गेले. त्यानंतर त्यांनी घरात लिहून ठेवलेले पत्र रुक्मिणीस सापडले आणि ते पत्र सिद्धोपंतानी वाचल्यावर घरातील सर्व मंडळी दु:खी झाली.

विठ्ठलपंत घरातून जाऊन सहा वर्षे झाली होती. पुढे योगायोगाने रामानंद स्वामी यात्रेस जात असताना ते आळंदी येथे मुक्कामास आले. त्यावेळी रुक्मिणी मैत्रिणीबरोबर त्यांच्या दर्शनास गेली. तेव्हा स्वामीने तिला आशीर्वाद दिल्यावर तिच्या डोळ्यातून अश्रू आले. त्यांनतर तिने आपल्या पतीविषयी त्यांना सर्व माहिती सांगितली आणि दुसऱ्या दिवशी स्वामीबरोबर ती व सिद्धोपंत काशी वाराणशीला गेले. तेव्हा तेथे स्वामीने विठ्ठलपंताना सर्व माहिती सांगून संन्यासाश्रमातून गृहस्थाश्रमात प्रवेश करण्यास सांगितले. त्यानंतर ते सर्वजन स्वामीचा आशीर्वाद घेऊन आळंदीस आले.

विठ्ठलपंतानी गृहस्थाश्रमात प्रवेश केला म्हणून सिद्धोपंतानी आळंदी व तेथील आसपासच्या गावातील मंडळीना भोजन घातले. पण या भोजनाच्या कार्यक्रमास गावातील काही ब्राह्मण मंडळी आली नाहीत. तसेच त्या मंडळीनी चार-पाच दिवसांनी मंदिरात 'धर्मसभा' आयोजित केली आणि विठ्ठलपंतानी संन्यासाश्रमातून गृहस्थाश्रमात प्रवेश केला म्हणून त्यांच्यावर त्या सभेत बहिष्कार टाकण्यात आला. विठ्ठलपंतांच्यावर बहिष्कार टाकल्यामुळे ते पत्नीसह सिद्धबेटावर झोपडी बांधून राहिले. तेव्हा तेथे त्यांना निवृत्ति,

ज्ञानदेव, सोपान व मुक्ताई अशी चार मुले झाली. ही मुले मोठी झाल्यावर त्यांची मुंज करावयाची की नाही यासाठी आळंदीतील ब्राह्मण मंडळीनी धर्मसभा आयोजित केली. त्यावेळी विठ्ठलपंतांनी देहांत प्रायश्चित्त घेतल्यावर त्यांच्या मुलांच्या मुंजीचा विचार करण्यात येईल असा निर्णय धर्मसभेतील प्रमुखांनी त्यांना दिला. हा निर्णय विठ्ठलपंतांनी आपल्या घरातील मंडळीना सांगितल्यावर ते सर्वजन दुःखी झाले. तसेच ही बातमी त्यांच्या सासू-सासऱ्यास समजल्यावर त्यांना मोठा धक्का बसला आणि हा धक्का सहन न झाल्याने त्यांच्या सासूबाईचे निधन झाले.

पुढे काही दिवसांनी विठ्ठल-रुक्मिणी हे आपल्या मुलांच्या भवितव्याचा विचार करुन ते देहांत प्रायश्चित घेण्यास काशी वाराणशीला घरी पत्र लिहून ठेवून निघून जातात. तेव्हा ज्ञानदेवादि भावंडे ते पत्र वाचून खूप दुःखी होतात. तसेच विठ्ठल-रुक्मिणी यांनी देहांत प्रायश्चित्त घेऊन दोन-अडीच महिने झाल्यावर ज्ञानदेवादि भावंडे मुंजीसाठी गावातील ब्राह्मण मंडळीना भेटतात. गावातील ब्रह्मसभेत त्या मुलांच्या मुंजीचा विषय घेण्यात येतो. तेव्हा या सभेतील मंडळीनी संन्यासाच्या मुलांची मुंज करता येत नाही असे सांगून ते यासंबंधीचे सर्व अधिकार पैठण विद्यापीठाला असल्याचे सांगतात आणि त्यांना एक शिफारस पत्र देतात.

ज्ञानदेवादि भावंडे हे पत्र घेऊन पैठणला जातात आणि ते तेथील धर्मसभेतील धर्मश्रेष्ठीना हे पत्र देतात. तेव्हा या सभेत या मुलांच्या मौजीबंधनासाठी बरीच चर्चा होते. तसेच केशवशास्त्रांनी ज्ञानदेवांना रेड्याच्या मुखातून वेद ऐकविण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांने सभेतील सर्व लोकांच्यासमोर रेड्यामुखी वेद वदविले. त्यानंतर या सभेचे मुख्य धर्माधिकारी श्रीधरपंतानी संन्याच्या मुलांची मुंज करता येत नसल्याचे सांगून त्यांना एक शुद्धिपत्र दिले.

ज्ञानदेवादि भावंडे पैठणमध्ये काही दिवस राहिले. तेथे ज्ञानदेवांनी 'श्राद्ध व मूलधर्म तत्त्वावर' प्रवचन सांगितले. त्यानंतर ती सर्व भावंडे पैठणहून नेवासे येथे येतात आणि तेथील धर्मशाळेत दीड वर्षे राहतात. तसेच नेवासे येथे ज्ञानदेवांनी गीतेवर बरेच चिंतन व लेखन केले आणि श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेली भागवद्गीता त्यांनी मराठी भाषेत तेथील श्रोत्यांना सांगितली. तसेच त्यांनी गीतेच्या सर्व अध्यायाचे निरूपण दररोज सायंकाळी थोडे थोडे

श्रोत्यांसमोर निरूपण करीत होते. त्याचवेळी सच्चिदानंदबाबा 'भावार्थदीपिके'चे लेखन करीत होते. या ग्रंथाचे सर्व अध्याय पूर्ण झाल्यावर शेवटी समाप्ती सोहळा साजरा करण्यात आला आणि ज्ञानदेवांनी शेवटी सर्वांचे आभार मानले. त्यांनी हा ग्रंथ लिहिला म्हणून श्रोते त्यांना 'ज्ञानेश्वर माऊली' असे म्हणत होते.

ज्ञानदेवांदि भावंडे नेवासेहून आळंदीकडे प्रवास करीत असताना, आळे या गावी आल्यावर वेद म्हटलेल्या म्हाताऱ्या रेड्याचा मृत्यू झाला. तेव्हा तेथील गावकऱ्यांच्या मदतीने खड्डा काढून त्याला मूठमाती देण्यात आली. त्यावेळी ज्ञानदेवांच्या डोळ्यात अश्रू आले. ज्ञानदेव हे माणसासारखे मुख्या प्राण्यावर प्रेम करीत होते. पुढे काही दिवसांनी ज्ञानदेवांदि भावंडे आळंदी येथे आल्यावर ज्ञानदेवांनी तेथील पंचक्रोशीतील लोकांच्या आग्रहामुळे 'भावार्थदीपिकेवर' प्रवचन सांगितले. तसेच आळंदीतील विसोबा चाटीनी त्यांनी भगवद्‌गीतेवर 'भावार्थदीपिका'हा ग्रंथ लिहिल्याबद्दल शिव्या देऊन त्यांना अपमानित केले. तेव्हा ज्ञानदेव झोपडीची ताटी लावून आतमध्ये झोपले आणि तिसऱ्या दिवशी मुक्ताने त्यांना ताटी उघडण्यास विनंती केल्यावर त्यांनी ताटी उघडून तिला मिठीत घेतले. तेव्हा त्यांच्या अंगात ताप असल्याचे तिला जाणवले आणि तिने ताप कमी होण्यासाठी त्यांच्या पाठीवर मांडे भाजले.

ज्ञानदेवांनी लिहिलेला 'भावार्थदीपिका' हा ग्रंथ टीकापर होता. तसेच त्यांनी हा ग्रंथ लिहिल्यामुळे विसोबा चाटी त्यांना रागावले होते. आणि गुरू निवृत्तिनाथांनी त्यांना स्वतंत्र ग्रंथ निर्मिती करण्यास सांगितले होते. म्हणून त्यांनी वाचन, मनन व चिंतन करुन काही महिन्यांनी अनुभवामृत हा ग्रंथ लिहिला. त्यांनी या ग्रंथाचे निरूपण आळंदीतील सिद्धेश्वराच्या मंदिरात सात दिवस सांगितले. तसेच त्यांनी आळंदीच्या पंचक्रोशीतील काही गावात या ग्रंथाचे निरूपण सांगितले आणि त्यांनी हा ग्रंथ पंढरपूरला नेल्यावर विठ्ठलचरणी अर्पण केला.

तापी नदीच्या तीरावर हटयोगी चांगदेवांचा आश्रम असून तेथे ते शेकडो शिष्यासह राहत होते. ज्ञानदेवांची कीर्ती ऐकून त्यांच्या भेटीची इच्छा चांगदेवांना झाली. त्यासाठी त्यांनी पत्र पाठविण्याचा निर्णय घेतला. पण वयाने लहान असलेल्या पण अनुभवाने मोठ्या असलेल्या ज्ञानदेवांना तीर्थरूप लिहावा की आशीर्वाद असा कोणता मायना लिहावा या

संभ्रमात त्यांनी ते पत्र कोरेच ज्ञानदेवांच्याकडे पाठवून दिले. पुढे ज्ञानदेवांनी त्या पत्रास 'चांगदेव पासष्टी' हा ग्रंथ लिहून त्यांना उत्तर पाठविले. पण चांगदेवांना त्या पत्राचा स्पष्ट बोध न झाल्याने ते त्यांना भेटण्यास आळंदीस आले. तसेच तेथे त्यांनी मुक्ताईचे गुरूत्त्व आपला अहंकार बाजूला ठेवून स्वीकारले. तेथे तो चार-पाच महिने राहिल्यावर त्यांचा अहंकार कमी होऊन हृदय कोमल व प्रेमळ झाले. त्यानंतर ते सर्वांचा आशीर्वाद घेऊन परत तापी तरी आपल्या आश्रमाकडे आले.

तीर्थयात्रा केल्याने माणूस आपल्या कोशातून बाहेर पडून जगाचा, विश्वाचा, समाजाचा अधिक वस्तुनिष्ठपणे विचार करु शकतो. यासाठी ज्ञानदेवादि भावंडानी संतमेळ्यास आपल्याबरोबर घेऊन उत्तरेकडे तीर्थयात्रेचा प्रवास केला. तसेच महाराष्ट्राबाहेरील प्रदेश, समाज, माणसे, शेती, तीर्थक्षेत्रे, नद्या, निसर्ग इत्यादीचा अनुभव घेण्यासाठी त्यांनी तीर्थयात्रा केली. त्यांनी तीर्थयात्रेच्यावेळी नाशिक, द्वारका, मथुरा, काशी, वाराणशी इत्यादी धार्मिक तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या.

एके दिवशी ज्ञानदेवांनी आपण संजीवन समाधी घेणार असल्याचे निवृत्तीला सांगितल्यावर त्यांनी त्यांना समाधी घेण्यास अनुमती दिली. तसेच समाधी दिवशी सांगितल्याप्रमाणे सर्व संतमंडळी व त्यांचे नातेवाईक आले होते. ज्ञानदेवांना संतमंडळी समाधिस्थानाकडे टाळ-मृदंग या वाद्याच्या गजरात घेऊन गेले. तेथे गेल्यावर त्यांनी समाधिस्थानाला तीन प्रदक्षिणा घालून जनतेला त्रिवार वंदन केले आणि त्यांनी समाधि स्थानात प्रवेश केला. त्यानंतर निवृत्तिनाथ समाधिस्थानातून हुदंके देत बाहेर पडले आणि त्यांनी व्दारावर शिळा लावून समाधीला नमस्कार केला.

त्यानंतर शेवटी नामदेव व संतमेळा अभंग म्हणत नाचत होते. त्याच गर्दीमधून कोणीतरी मोठ्या गंभीर आवाजात पुढीलप्रमाणे गाऊ लागला,

''अंधार युगाच्या दिनकरा,
हे संत, तत्त्वज्ञ, वागीश्वरा,
लोकसख्या ज्ञानेश्वरा,
महामानवतेच्या शिल्पकारा, युगधर्म धुरंधरा,

शत कोटी नमस्कार ऽ र तुला आमुचे ।

शत कोटी नमस्कार ऽ ऽ र तुला आमुचे ।"[२]

अशाप्रकारे तो मोठमोठ्या सुरात गात होता आणि लोक ते ऐकून थरारत होते. "पण ज्ञानदेव या सर्वांच्या पलीकडे गेले होते आणि चराचर विश्वातील चैतन्याशी एकात्म होऊन सर्वांचे झाले होते"[३] कथानकाचा शेवट अशा पद्धतीने विचार करायला लावणारा आहे.

अश प्रकारे 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीचे कथानक अनेक वळणे घेऊन एका बोधवादी शेवटापर्यंत येऊन थांबते. कादंबरीचे कथानक घटनाप्रधान आहे. ज्ञानदेवांचे जीवनचरित्र वास्तव रेखाटणे हेच या कादंबरीचे उद्दिष्ट्ये असल्याचे दिसून येते.

## ६.३ व्यक्तिरेखन :

कथानकाला गतिमान करण्याचे काम पात्रेच करीत असतात. कादंबरीत पात्रे अत्यंत महत्त्वाची असून त्यांच्याशिवाय कादंबरीच्या कथानकाला आकार येऊ शकत नाही. तसेच कथानक, प्रसंग, वातावरण निर्मिती, भाषा इत्यादी घटकांमधून पात्रचित्रण आकारास येत असते. त्याचबरोबर या घटकावरच कादंबरीचे यशापयश अवलंबून असते. एखाद्या कादंबरीत कितीही पात्रे असू शकतात. त्याला ठराविक असा नियम नाही. या अनुषंगाने सदर कादंबरीतील व्यक्तिरेखनांचे स्वरूप पाहू.

आपल्या एकुलत्या एका मुलांवर खूप प्रेम करणाऱ्या व त्याने न सांगता विवाह केला तरी राग न मानणाऱ्या गोविंदपंत व नीराबाई या भावनाप्रधान व शांत स्वभाव असलेल्या व्यक्तिरेखा लेखकाने अत्यंत प्रत्ययकारीपणे चित्रित केल्या आहेत. तसेच आपल्या मुलास अपत्यप्राप्ती नसल्याने त्यांना खूप दुःख झाले होते आणि त्यांचा या मानसिक आजाराने मृत्यू होतो. अशा प्रसंगाने त्यांच्या जीवनाचा शेवट झाल्याने या व्यक्तिरेखा आपल्या दीर्घकाळ लक्षात राहतात.

रुक्मिणीशी विवाह करुन आपल्या आई-वडिलांना भेटण्यास जाणारा, अपत्यप्राप्ती नसल्याने संन्यास घेऊन पुन्हा गृहस्थाश्रमात प्रवेश करणारा व विठ्ठलभक्त असलेला विठ्ठलपंत ही व्यक्तिरेखा लेखकाने अत्यंत कौशल्याने या कादंबरीत चित्रित केलेली आहे. तसेच धर्मसभेने दिलेला निर्णय प्रामाणिकपणे मान्य करून देहांत प्रायश्चित्त घेणारा विठ्ठलपंत ही

व्यक्तिरेखा बरेच काही सांगून जाते. या कादंबरीतील विठ्ठलपंत ही व्यक्तिरेखा महत्त्वाची असून ती नीतीपुढे कशी हतबल होते, तसेच त्यांच्या संपूर्ण जीवनातील कारुण्य आणि भीषणता लेखकाने अत्यंत प्रत्ययकारीपणे चित्रित केल्याने ही कादंबरी अधिक उठावदार झाल्याची दिसते.

आपल्या मुलीवर मुलांप्रमाणे प्रेम करणाऱ्या व तिचा विवाह मोठ्या थाटात करून देणाऱ्या सिद्धोपंत व उमाबाई या व्यक्तिरेखा यादवांनी प्रभावीपणे चित्रित केलेल्या आहेत. तसेच आपल्या जावायास देहांत प्रायश्चित्ताची शिक्षा दिल्याची बातमी समजल्यावर उमाबाईना मानसिक धक्का बसतो आणि त्यातच तिचा मृत्यू होतो. अशा प्रसंगांने या प्रेमळ व्यक्तिरेखेचे निधन झाल्याचे लेखकाने या कादंबरीत चित्रित केल्यामुळे ही व्यक्तिरेखा आपणाला विचार करायला लावणारी आहे.

संपूर्ण जीवनात हाल अपेष्टा सहन करून काहीही दोष नसताना देहांत प्रायश्चित्त घेणारी व पतिव्रता असलेली रुक्मिणी ही व्यक्तिरेखा लेखकाने अत्यंत प्रत्ययकारीपणे रंगविल्यामुळे कादंबरी अधिक उठावदार झाली आहे. तसेच या हृदयस्पर्शी व्यक्तिरेखेबद्दल हळहळ वाटणे स्वाभाविकच असल्याने ती कायमस्वरूपी वाचकांच्या लक्षात राहते.

विठ्ठल-रुक्मिणी यांना सिद्धबेटावर झोपडी बांधून देणारा व सिद्धोपंताची शेती करणारा हैबती ही प्रामाणिक व्यक्तिरेखा व रुक्मिणीला घरकामात मदत करणारी त्यांची पत्नी पार्वती ही निर्मळ मनाची व्यक्तिरेखा या कादंबरीत लेखकाने चित्रित केल्या आहेत. तसेच या गौण व्यक्तिरेखांना कादंबरीत महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते.

आपल्या भावंडावर प्रेम करणारा, नाथसंप्रदायाची दीक्षा स्वीकारणारा, तल्लाख बुद्धीचा व शांत स्वभाव असलेला निवृत्ती. तसेच मुक्ताईला घरगुती कामामध्ये मदत करून भावंडांची काळजी करणारा सोपान. त्याचबरोबर ज्ञानदेवाला ताटी उघडण्यासाठी आज्ञा करून त्यांच्या पाठीवर मांडे भाजणारी, आपल्या भावंडांना आईची माया देणारी, ज्ञानदेवांची संजीवन समाधी घेतल्यावर रडणारी व समजूतदार प्रवृत्तीची मुक्ताई. या सर्व व्यक्तिरेखा लेखकाने अत्यंत प्रत्ययकारीपणे चित्रित करून कादंबरीला उठावदार करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच त्या वाचकांना बरेच काही सांगून जातात.

ज्ञानदेवांनी भगवद्गीतेवर मराठी भाष्य लिहिले म्हणून त्यांना शिव्या देऊन अपमानित करणारी विसोबा चाटी ही गौण व्यक्तिरेखा लेखकाने अत्यंत कुशलतेने रेखाटले आहे. तसेच अहंकारीवृत्ती असलेला, ज्ञानदेवांच्याकडून विद्या आत्मसात केलेला व स्वभावात अमूलाग्र बदल झालेला हटयोगी चांगदेव ही गौण व्यक्तिरेखा लेखकाने चित्रित केली असून ती वाचकाला एका वेगळ्याच अनुभव विश्वात घेऊन जाते.

या कादंबरीची मुख्य व्यक्तिरेखा म्हणजे ज्ञानदेव. त्यांचे व्यक्तिचित्रण यादवांनी अत्यंत प्रत्ययकारीपणे रेखाटलेले आहे. तसेच ज्ञानदेवांची चरित्रकहाणी हा या कादंबरीचा महत्त्वाचा भाग आहे. आपल्या पायावर ठामपणे उभारुन मुंजीसाठी प्रयत्न करणारे त्यासाठी खूप त्रास सहन करणारे, तीर्थयात्रा करणारे, अनेक ग्रंथ लिहिणारे, वारकरी संप्रदायाचा पाया घालणारे, पंढरपूरच्या विठ्ठलाचे भक्त असलेले आणि शेवटी संजीवन समाधी घेणारे 'ज्ञानदेव' ही व्यक्तिरेखा लक्षात राहण्यासारखी आहे. तसेच लेखकाने ज्ञानदेवांचे व्यक्तिचित्रण अनेक प्रसंगातून उठावदार करण्याचा केलेला प्रयत्न उल्लेखनीय आहे. त्याचबरोबर त्यांच्या भोवती लेखकाने अनेक व्यक्तिरेखा रेखाटून ज्ञानदेवांच्या व्यक्तिचित्राला उठावदार करण्याचा प्रयत्न केला आहे.

विठ्ठलपंताचे मित्र केशवशास्त्री, श्रीधरपंत, मारुती, सच्चिदानंदबाबा, नामदेव, गोरा कुंभार, गणू, चिंतामणीशास्त्री, गंगाधरपंत, दत्तोपंत, धुडिंराजशास्त्री इत्यादी गौण व्यक्तिरेखा या कादंबरीत लेखकाने चित्रित केल्या असून त्या अविस्मरणीय वाटतात. यानंतर या प्रकरणात 'समाजचित्रण' या मुद्याचा अभ्यास करणार आहोत.

### ६.४ समाजचित्रण :

आनंद यादव यांच्या 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीतील समाजचित्रण अभ्यासणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तत्कालीन समाजातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक इत्यादी सर्व क्षेत्रांचे या कादंबरीत प्रतिबिंब उमटले आहे.

महाराष्ट्रातील आळंदी, नेवासे, आपेगाव, पैठण, पंढरपूर इत्यादी धार्मिक स्थळांचे व त्या परिसरात असलेल्या अनेक खेड्यातील समाजचित्रण या कादंबरीत चित्रित झालेले आहे. हे लेखकाने अत्यंत प्रभावीपणे चित्रित केल्यामुळे ही कादंबरी उठावदार झाली आहे.

तसेच तत्कालीन समाजातील शेतकरी, व्यापारी, देवळाचे पुजारी, सोनार, सावकारकी इत्यादी परंपरागत व्यवसाय करणाऱ्या लोकांचे व समाजात असणाऱ्या अठरापगड जाती-जमातीचे चित्रण या कादंबरीत केल्यामुळे ही कादंबरी एक प्रकारे वेगळाच ठसा निर्माण करते.

तत्कालीन समाजात असलेल्या सामाजिक स्तरभेद, जातीची कठोर बंधने, पिढीजात मक्तेदारी, कर्मठ ब्राह्मण समाज इत्यादीचे चित्रण या कादंबरीत रेखाटलेले आहे. तसेच त्याकाळी समाजातील वाद, तंटे व भांडणे इत्यादी मिटविण्यासाठी गावात धर्मसभा घेतली जात होती आणि त्या सभेने दिलेला निर्णय सर्वांना मान्य करावा लागत होता.

विठ्ठलपंतांनी संन्यासाश्रमातून गृहस्थाश्रमात प्रवेश केला म्हणून ब्राह्मण समाजातील मंडळीनीच 'धर्मसभा' घेऊन त्यांच्यावर बहिष्कार टाकला. म्हणजेच त्यांनी आपल्याच समाजातील व्यक्तिवर बहिष्कार टाकला. एवढेच नव्हे तर त्या समाजाने त्यांच्या मुलांच्या मुंजी करण्यास नकार देऊन विठ्ठलपंतांना देहांत प्रायश्चित्ताची शिक्षा दिली. त्याचबरोबर त्या समाजातील लोकांनी त्या मुलांच्या भवितव्याचा कोणताही विचार केला नाही. उलट त्यांना संन्याशाची पोरे म्हणून नावे ठेवली. यावरुन तत्कालीन समाजात असलेली न्यायदानाची पद्धत समजते. तसेच तत्कालीन ब्राह्मण समाजातील लोक हे कर्मठ प्रवृत्तीचे दिसतात. अशा अनेक प्रसंगातून या कादंबरीत आलेले समाजचित्रण दिसते. तसेच तत्कालीन जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न लेखकाने आपल्या अनुभवाद्वारे केलेला आहे.

तत्कालीन समाजातील स्त्रिया धार्मिक व श्रद्धाळू वृत्तीच्या होत्या. तसेच विधवा स्त्रियांना व पुत्रप्राप्ती नसलेल्या स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा नव्हती. त्याचबरोबर त्याकाळी समाजातील स्त्रीही कन्या, पत्नी, माता अशा स्वरूपातच आपले जीवन जगत होती. तत्कालीन समाजमनावर रुढी, परंपरा, चाली-रीती, कर्मकांड इत्यादीचा पगडा असल्याने लेखकाने त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

शिक्षण, मुंज, संन्यास, विवाह, अपत्यप्राप्ती, श्राद्धविधी, गृहस्थाश्रम, जातीची बंधने, धर्मशास्त्राचा आधार इत्यादी समाजातील अनेक प्रसंगांचे चित्रण या कादंबरीतून केल्याचे दिसते. तसेच त्याकाळी समाजापुढे अनेक समस्या असल्याने लेखकाने त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न या कादंबरीमधून केल्याचे दिसते. या कादंबरीमध्ये जे समाजचित्रण केलेले

आहे. ते वास्तवतेला धरून असल्याने ही कादंबरी वास्तववादी ठरते याविषयी शंका नाही. तत्कालीन समाजचित्रण घडविणारी कादंबरी म्हणून 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीचा विचार करावाच लागतो.

## ६.५ भाषाशैली :

सदर कादंबरीतील भाषाशैलीचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. लेखक भाषेच्या माध्यमाद्वारेच साहित्यकृतीची मांडणी करीत असतो. तसेच लेखकाने कादंबरीमध्ये भाषेचा वापर कसा केलेला आहे याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. या कादंबरीची निवेदन पद्धती तृतीय पुरुषी आहे. तसेच लेखकाने कादंबरीतील निवेदनासाठी नागर भाषा व संवादासाठी ग्रामीण भाषा अशी वापरलेली दिसते. या कादंबरीतील भाषा अत्यंत सोपी, सहज आणि स्वाभाविक वाटणारी अशी आहे.

भावना व विचार व्यक्त करण्याचे माध्यम भाषा असल्यामुळे लेखकानुसार भाषेचे स्वरूप बदलते. तसेच कादंबरीतील पात्रे, प्रसंग, निवेदन, संवाद इत्यादीनुसार भाषा बदलत असते. कादंबरीत पात्रमुखी भाषाही महत्त्वपूर्ण मानली जाते. या कादंबरीमध्ये काही प्रमाणात प्रादेशिकता आढळते. पैठण, आपेगाव, आळंदी, काशी, वाराणशी, पंढरपूर, नेवासे इत्यादी ठिकाणांतील भाषेचे चित्रण या कादंबरीत येते. उदाहरणार्थ, विवाहानंतरच्या प्रसंगाचे वर्णन सदर कादंबरीत आले आहे ते पुढीलप्रमाणे असे आहे, ''लग्नानंतरचे हळद काढण्याचे विधिदिवस संपल्यावर रुक्मिणी गावातील मैत्रिणींच्या घरी पाहुणचारासाठी जाऊ लागली. मैत्रिणीच्या समवेत भावी संसाराची सुंदर सुंदर चित्रे रंगवू लागली. तिच्या मैत्रिणी तिला खोदून खोदून खोडकर गोष्टी विचारू लागल्या. तिच्या बरोबर हसू-खिदळू लागल्या. तिच्या मनातील स्वप्निल संसाराची चित्रं तिच्याकडून वदवून, रेखाटून घेऊ लागल्या. छोट्या छोट्या संसारोपयोगी वस्तू भेटरूपानं देऊ लागल्या, हरवत चाललेलं आपलं रुक्मिणीबरोबरचं बालपण आठवून व्याकुळ, भावविवश होऊ लागल्या. रुक्मिणी आता लौकरच सासरी जाणार या कल्पनेनं डोळे भरू लागल्या.''[४]

निवृत्तिनाथ हे ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा घालून परत येत असताना त्यांच्या वाटेत अचानक वाघ आल्यामुळे जो प्रसंग घडला त्याचे वर्णन या कादंबरीत आले आहे ते असे

चित्रित झाले आहे, निवृत्ती सांगू लागला, ''अंग आई, वाटेवर वाघ अचानक आला नि त्यानं माझ्या नि बापूंच्या मध्येच उडी घेतली. वाटेवरून बापू आणि ज्ञानू वरती चाललेले. मी रेंगाळत मागून येत होतो. तर वाघोबा, मध्येच आले. बापू म्हणाले, 'खालच्या दिशेनं जोरात पळ.' मी जीव मुठीत घेऊन पळू लागलो. आक्राळविक्राळ वाघोबा बघून मी खूपच गांगरलो. पळू लागलो तर वाघोबानं आणखी एक जोरात डरकाळी फोडली. मी आणखी सुसाट पळालो. पाठीमागं पाहायला मला धीरच होईना. म्हणून वाट दिसेल तिकडं पळू लागलो.''[५]

वेद म्हटलेल्या रेड्याचा मृत्यू झाल्यानंतर त्याला मूठमाती देण्यात आली. त्या प्रसंगाचे वर्णन या कादंबरीत आले आहे ते पुढीलप्रमाणे असे आहे, ''सगळा दिवस आळ्यामध्ये रेड्याची व्यवस्था लावण्यात गेला. गावातील लोक मदतीला घेतले. रेड्याची लांबीरुंदी इतका पाचसहा हात खोल खड्डा खणला. खड्डा तयार केल्यावर तळात वाळलं गवत आंथरलं. ज्ञानदेवांनी त्या मृत महिषाला तेल लावून आंघोळ घातली. शेंदूर लावून त्याची पूजा केली. सांग्या लावून लोकांनी रेडा अलगद उचलला आणि खड्ड्यात सोडला. ज्ञानदेवांनी खड्ड्यात उतरून त्याच्या मुखात भाकरी आणि गवताचा घास घातला. ज्ञानदेवांचे डोळे पाण्यानं डबडबले. त्यांनी आपली नित्याची पांघरण्याची पासोडी त्याच्या अंगावर घातली. तिच्यावर फुलं वाहिली. मंत्र म्हणून मूठमाती दिली. नंतर गावकऱ्यांनी तो खड्डा माती ओढून बुजवला. रेडा चिरविश्रांत झाला.''[६]

यानंतर या कादंबरीत आलेल्या उपमा व प्रतिमांचा अभ्यास करणे उचित ठरेल. या कादंबरीत उपमा व प्रतिमांचा वापर केल्याचे दिसते. उपमा व प्रतिमा यांच्यामुळे कादंबरीतील घटनाप्रसंग उठावदार होतात. तसेच कादंबरीतील पात्रांचे भाव-स्वभाव समजण्यास मदत होते. या कादंबरीतील उपमा व प्रतिमा यांची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे :

१) ''तो गायीसारखा हंबरून गात होता''.[७]

२) ''सूर्याचा लाल गुलाबी गोळा डोंगराआड नाहीसा झाला''.[८]

३) ''विठ्ठलपंत साक्षात सरस्वती बोलते आहे तुमच्या मुखातून''.[९]

अशाप्रकारे उपमा अलंकार कादंबरीत आल्याचे दिसते. तसेच या कादंबरीत आलेल्या प्रतिमा पुढीलप्रमाणे :

१) ''चोपड्याला स्वत:चेच नाव देऊन बेडकासारखा उड्या मारत गावोगाव भटकतोस''.[१०]

२) ''गणोबासारख्या माणसांच्या अंगात नाना कळा असतात''.[११]

३) ''यमसेवक असलेला हा रेडा आपले प्राण वाचविणारा परमेश्वर आहे''.[१२]

४) ''पंताची तळमळ थंड होत चालली आणि ते लाकडासारखे ताठ होऊन निपचित पडले.''[१३]

५) ''पूर्वेला पूर्ण चंद्रोदय झाला आणि वाळवंट चांदण्यात न्हाऊन निघालं''.[१४]

६) ''भादव्यात अश्विनात ही हिरवी पिकं गडद हिरवी होत गेली. वाढत चालली. त्यांचा हिरवेपणा प्रौढ वयात आलेल्या युवतीसारखा मुग्धमनोहर वाटू लागला''.[१५]

७) ''पांढऱ्या मातीची साधी, बैठी घरं आणि छोट्या, वेड्या वाकड्या गल्ल्या उराशी घेऊन गाव मुक्या प्राण्यागत आपलीच ऊब आपल्याला घेत स्वत:भोवती मुरडा मारून बसलेल्या गरीब गायीगत दिसत होतं''.[१६]

८) ''कोणत्याही माणसाच्या जीवनाच्या चाकाला अनेक आऱ्या असतात''.[१७]

९) ''इंथ गंगामातेनं धनुष्याकृती किंवा चंद्रकोरीसारखं मोठं वक्र वळण घेतलं आहे''.[१८]

अशाप्रकारे या कादंबरीत अनेक प्रभावी प्रतिमा आलेल्या आहेत. या कादंबरीत आलेल्या प्रतिमा अर्थवाही असून त्या आशयातील विविधताही स्पष्ट करतात.

सदर कादंबरीत काही म्हणी व वाक्यप्रचारांचा वापर केल्याचे दिसते. त्यामुळे भाषेला जिवंतपणा येतो आणि भाषासंपन्नही होते. त्याचबरोबर त्यांचा वापर कादंबरीत केल्याने पात्रांची भाव-व्यथा स्पष्ट होण्यास मदत होते.

या कादंबरीत आलेले वाक्यप्रचार पुढीलप्रमाणे: काळजाचे पाणी होणे, शोकसागरात खोल बुडणे, हंबरडा फोडणे, चकित होणे, रोमांच उभारणे, कपाळावर सोपवणे, अपमानित होणे, गंभीर होणे, बहिष्कार टाकणे, डोळ्यात पाणी डबडबणे, लहान तोंडी मोठा घास घेणे, जन्माचे सार्थक होणे, पालापाचोळा शिल्लक राहणे, घोडचूक करणे, ब्रह्मानंद होणे,

चिंताग्रस्त होणे, हातापायातील बळ निघून जणे इत्यादी वाक्यप्रचार कादंबरीत जागोजागी आल्यामुळे पात्रांचे स्वभावविशेष अधिक ठसठशीत झाल्याचे दिसते. या कादंबरीत आलेल्या म्हणी पुढीलप्रमाणे :

१) ''करून करून भागले आणि देव पूजेला लागले.''[१९]

२) ''नकटं असलं तरी चालेल, पण धाकटं असणं सर्वात वाईट''.[२०]

'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीमध्ये शेतीशी निगडित शब्द चित्रित झाल्याचे दिसते. ते आशयाचा भाग म्हणून कादंबरीत आलेले आहेत. तसेच तत्कालीन काळात महाराष्ट्र हा खेड्यांनी बनलेला होता आणि त्या काळात शेती हा प्रमुख व्यवसाय होता. उदा.: विहीर, मोट, नांगरणी, खरीप, बागायती, कुळवणे, बैल, म्हैस, गाय, रेडा, बैलगाडी, गुरंढोरं, मशागत, पेरणी, मळणी, कापणी, सुगी, गहू, दूध, भाजीपाला, भात, शेंगा, हरभरा, कडधान्ये इत्यादी शेतीशी निगडित असलेल्या शब्दांतून ग्रामीण जीवनाचा प्रत्यय येतो.

या कादंबरीत शिव्या सदृश्य शब्दांचा वापर केल्याचे दिसून येते. तसेच त्या क्वचितप्रसंगी आलेल्या आहेत. कादंबरीतील व्यक्तिरेखा या आपला राग, द्वेष व्यक्त करण्यासाठी शिव्या देत असल्याचे दिसते. तसेच या कादंबरीत आलेल्या शिव्या पुढीलप्रमाणे. : भडव्या, गधड्या, मुर्खा, गोसावड्यांनो, थोबाड फोडून टाकीन इत्यादी. अशा प्रकारच्या शिव्यांचा वापर या कादंबरीत केल्याचे आढळते.

सदर कादंबरी ही संतचरित्रपर असल्याने त्यामध्ये ओवी, अभंग, विराणी, भजन, गाणी इत्यादीचा समावेश केल्याचे दिसून येते. तसेच हे सर्व घटक कादंबरीत चित्रित झाल्याने कादंबरीचा आशय अधिक उठावदार झाल्याचे दिसते आणि त्यामुळे कादंबरीला सौंदर्यही प्राप्त झाल्याचे दिसते. या कादंबरीत आलेल्या ओव्या पुढीलप्रमाणे : ज्ञानदेवांनी श्रोत्यांना 'भावार्थदीपिकेचे' निरूपण सांगून झाल्यावर त्यांनी ओवीबद्ध पसायदान पुढीलप्रमाणे सांगितले.

''आता विश्वात्मके देवें । येणें वाग्यज्ञे तोषावें ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ।।
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।

भूतां परस्परें पडो मैत्र जीवाचें ।।

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।

जो जें वांछील तो तें लाहो । प्राणीजात ।।[२१]

ज्ञानदेवांनी चांगदेवांना काही ओव्या पत्राद्वारे लिहून पाठविल्या. त्या पुढीलप्रमाणे :

प्रगटे तंव तंव न दिसे । लवे तंव तंव आभासे ।

प्रगट ना लपाला असे । न खोमता जो ।।''[२२]

अशाप्रकारे त्या पत्रात अनेक ओव्या होत्या.

ज्ञानदेवांनी ओवीबरोबरच काही विराण्याही लिहिल्या आहेत. त्यातील या कादंबरीत चित्रित झालेली विराणी पुढीलप्रमाणे :

पैल तो गे काऊ कोकताहे ।

शकुन गे माये सांगताहे ।।१ ।।

उड उडरे काऊ तुझे सोन्यानें मढीन पाऊ ।

पाहुणे पंढरीराऊ घरात कैं येती ।।२ ।।[२३]

अशाप्रकारे या विराणीमधून त्यांनी कावळ्यास शुभशकुन विचारून पंढरीचा विठूराया पाहुणे म्हणून माझ्या घरी केव्हा येतील ते सांग अशी इच्छा व्यक्त केली आहे. या कादंबरीत ओवी, विराणी याप्रमाणे अभंगसुद्धा चित्रित झालेले आहेत. तीर्थयात्रेच्यावेळी नामदेवांनी संत मेळ्यासमोर पुढीलप्रमाणे अभंग म्हटला,

''... तू अवकाश मी भूमिका ।

तू लिंग मी साळुंका ।

तू समुद्र मी द्वारिका । स्वये दोन्ही ।।

तू वृंदावन मी चिरी ।

तू तुळशी मी मंजिरी ।

तू पावा मी मोहरी । स्वये दोन्ही ।।''[२४]

संतमेळा तीर्थयात्रा करून पंढरपुरात आल्यावर नामदेवांनी आपले मनोगत व्यक्त करताना पुढील अभंग म्हटला,

"तीर्थे करोनी नामा पंढरीये आला।

जिवलगा भेटला विठोबासी ।।१ ।।

सद्गदित कंठ वोसंडला नयनीं।

घातली लोळणी चरणांवरी ।।२ ।।"[२५]

अशाप्रकारे त्यांची अवस्था तीर्थयात्रा करून आल्यावर झाली होती. या कादंबरीमध्ये अभंगाप्रमाणे गाणीही चित्रित झालेली आहेत. ज्ञानदेवांदि भावंडे नेवासेहून आळंदीस बैलगाडीने प्रवास करीत असताना बैलांचा उत्साह वाटावा म्हणून बैलगाडीवान मारूतीने पुढीलप्रामणे गाणे गायिले,

माझ्या राजा रं ऽ माझ्या सर्जा रं ऽ

पाय उचला भरारा ऽऽ

पाय उचला भरारा ऽऽ

तुमच्या गाडीत बसलेलंऽ

देव चाललं माहेराऽऽ

देव चाललं माहेराऽऽ

देवाच्या आळंदीला ऽऽ

देव चाललं माहेराऽ

देव चाललं माहेराऽऽ"[२६]

अशाप्रकारे या कादंबरीत लोकसाहित्य समाविष्ट झाल्याचे दिसते. तसेच या कादंबरीत भजनांचेही उल्लेख आलेले आहेत. संतमेळा तीर्थयात्रेच्यावेळी आळंदी येथे आल्यावर नामदेवांनी पुढील भजन म्हटले,

चक्रवाक पक्षी वियोगें बाहाती।

झाले मजप्रती तैसे आता।

चुकलिया माय बाळके रडती।

झाले मजप्रती तैसे आता ।।[२७]

यानंतर या प्रकरणात 'निवेदन शैली' या मुद्द्याचा अभ्यास करणार आहोत.

## ६.६ निवेदनशैली :

कादंबरी हा निवेदनप्रधान वाङ्मयप्रकार आहे. कादंबरीतील संवाद, प्रसंगचित्रण, व्यक्तिरेखन इत्यादी बाबींना निवेदनामुळेच महत्त्व प्राप्त झालेले असते. कादंबरीत प्रथमपुरुषी अथवा तृतीयपुरुषी निवेदक असतो. निवेदन हे कथानकातील सर्व घटनाप्रसंगाबरोबर येत असल्याने त्यात वर्णन असते. तसेच पात्रापात्रात संभाषण असते. सदर कादंबरी ही तृतीयपुरुषी निवेदनातून साकारलेली आहे.

कादंबरी ह्या वाङ्मयप्रकारात संवादाला महत्त्वाचे स्थान दिले जाते. तसेच कथानकाची रंगत वाढविण्यासाठी संवाद महत्त्वपूर्ण असतात. संवादामुळे प्रसंग अथवा घटना अधिक प्रभावी होतात. संवादाची मांडणी योग्य पद्धतीने व योग्य ठिकाणी करणे आवश्यक असते. कादंबरीत संवादाचा वापर केल्यामुळे व्यक्तिरेखांचे वृत्ती-प्रवृत्ती समजतात. त्याचबरोबर कादंबरीतील व्यक्तिरेखांमुळे संवादाचे स्वरूपही बदलते. कादंबरीतील संवादामुळे घटनाप्रसंग जसाच्या तसा डोळ्यासमोर उभा राहतो. उदाहरणार्थ या कादंबरीतील काही संवाद पुढीलप्रमाणे : धर्मसभेच्यावेळी झालेल्या पुढील संवादातून विठ्ठलपंतांच्या स्वभावाचा उत्तम प्रकाश पडतो.

विठ्ठलपंत थोडे दूर एका बाजूला बसले होते. त्यांना हाकारून त्र्यंबकपंत म्हणाले, ''विठ्ठलपंत, आतापर्यंत झालेली चर्चा आपण ऐकली?''

विठ्ठलपंत उभे राहून म्हणाले, ''ऐकली''.

''सभेचा निर्णय आपण ऐकला?''

''ऐकला''.

''आपणास निर्णय मान्य आहे?''

''मान्य आहे...''विठ्ठलपंत शांतपणे म्हणाले.

सिद्धोपंत असहाय होऊन कळवळले. त्यांना दुसरा कोणताच मार्ग दिसेना.

तोपर्यंत त्र्यंबकशास्त्रांनी विचारले, ''सिद्धोपंत, तुम्ही निर्णय ऐकला?''

''ऐकला''.

''तुम्हाला तो मान्य आहे?''

"विठ्ठलपंतांना मान्य असल्यामुळे मलाही तो मान्य करावा लागत आहे."[२८]

ज्ञानदेवांचा स्वभाव किती नम्र होता. हे पुढील संवादामधून दिसून येते.

"नमस्कार भूदेव! नमस्कार विसूकाका".

असं म्हणून दोघे निमिषभर थांबले आणि चालू लागले.

"थांबा रे पोरांनो, संन्याशी विठू कुलकर्ण्यांचीच मुलं ना तुम्ही?" विसोबांचा प्रश्न

"होय काका, मी ज्ञानदेव आणि हे माझे थोरले बंधू निवृत्ति."

"भगवद्‌गीतेवर प्राकृतात भाष्य लिहिलं म्हणे तू?"

"होय, काका, नेमकं 'भाष्य' म्हणता येणार नाही. गीतेचा भावार्थ लक्षात घेऊन सरळ, सोप्या मराठी भाषेत विस्तारानं लिहिलं. सर्वसामान्य लोकांना गीता समजावी, हा त्यामागचा हेतू होता".

"त्या चोपड्याला शीर्षक काय दिलंस?"

"भावार्थदीपिका, असा त्याचा मथळा आहे. पण त्याला आता 'ज्ञानेश्वरी' म्हणूनच लोक ओळखू लागले आहेत". ज्ञानदेव नम्रपणे सरळ उत्तर देत होते.

"वय काय तुझं?"

"विसावं चालू आहे."[२९]

ग्रामस्थ व अंगात आलेली स्त्री यांच्यामध्ये झालेला संवाद या कादंबरीत चित्रित झाला आहे. तो पुढीलप्रमाणे असा असा आहे,

"... बोल, बोल, तुला काय पाहिजे. गावाची काय चुकी झाली असंल तर सांग. कुणी आगळीक केली असंल तर सांग". मांत्रिक म्हणाला. त्यानं दगडावर काठीचे दोन-तीन दणके दिले.

बाई नुकतीच फूऽऽफूऽऽ करू लागली.

"बोल बया, बोल...", मांत्रिकानं धुनीत पुन्हा धूप टाकला. धूर झाला नि पुन्हा भडका उडाला.

बया बोलू लागली, ''गाव मला इसरत चाललंय. यंदाची सुगी मी भरपूर पिकवली. गावाच्या मनाजोगं पाऊसपाणी दिलं. गुरंढोरं पोसली. तरी गोरगरिबांसाठी गावानं गावजेवाण अजून घाटलं न्हाई''... असं म्हणून ती थांबली. पुन्हा घुमू लागली.

मांत्रिक घोळक्याला उद्देशून म्हणाला, ''काय गावकऱ्यांनो'' खरं हाय का हे?''

गावकरी एकमेकांकडे बघू लागले.

बया एकदम किंचाळली. पुन्हा जोर जोरानं फूऽफूऽऽ करू लागली.

घोळक्यात बसलेला मुकादम उद्गारला, 'हे थोडं खरं हाय... अजून कुणाकुणाची सुगी रानातनं घरात यायची हाय. मागच्या वर्सी कडसार हुतं म्हणून गावजेवाण लांबणीवर पडलंय... आता ते येत्या म्हैन्याच्या आमुशाला घालू''.

...बया पुन्हा जोरात फुत्कारू लागली.

मांत्रिक म्हणाला, ''अजून तुला कहाय पाहिजे. बोल, आई'' असं म्हणून त्यानं धुनीत पुन्हा धूप टाकला.

''...मला पांढरा शिंगाडा बकरा पाहिजे... त्येच्या मुंडीचा निवद माझ्या दारात आमुशाला आला पाहिजे.'' बया हात फिरवू लागली.

''देऊ देऊ! आई, तुझ्या मनासारखी तुझी शांती करू''. गावकरी उद्गारले.[३०]

अशाप्रकारचे अनेक संवाद या कादंबरीत आलेले आहेत. तसेच हे संवाद कादंबरीच्या कथानकाला मदत करतात. या कादंबरीतील संवादासाठी बोली भाषेचा वापर केल्याचे दिसते. त्याचबरोबर या कादंबरीतील संवाद हे प्रभावी असल्याचे दिसून येते.

या कादंबरीतील निवेदनात छोटी-छोटी वाक्ये आलेली आहेत. तसेच या वाक्यामुळे निवेदनाची परिणामकारता वाढते. विठ्ठल-रुक्मिणी हे देहांत प्रायश्चित घेण्यास निघून गेल्यावर त्यांच्या मुलांची झालेली अवस्था पुढीलप्रमाणे चित्रित झाली आहे.

उदा. ''विठ्ठलपंत-रुक्मिणी निघून गेले. त्याला आजचा चौथा दिवस होता. सिद्धबेटाच्या झोपडीत चारही मुलं मूकपणे बसून होती.''[३१]

चांगदेव हे ज्ञानदेवांना भेटण्यास येत होते. त्यावेळच्या प्रसंगाचे वर्णन सदर कादंबरीत असे आलेले आहे.

''चांगदेवांचा जथा समोरून येताना दिसला. वाघावर आरुढ झालेले चांगदेव सर्वात पुढे. एका हातात सर्पाचा चाबूक वळवळत होता. धिम्या गतीनं चालणारा तगडा वाघ गुरगुरत सावकाश पावलं टाकत होता. त्याच्या पुढं चांगदेवांचे शिष्य, शिंग, तुतारी, शंख, डंका वाजवत चालले होते. मागून शंभरभर भगव्या कफनीतील शिष्य जयजयकार करत पताका उंचावत चालत होते. ते दृश्य पाहून सोपानाच्या अंगावर काटा उभा राहिला.''[३२]

पाऊस पडल्यामुळे निसर्गात झालेल्या बदलाचे वर्णन सदर कादंबरीत असे आले आहे.

''मृगाचं नक्षत्र पावसाच्या उड्या मारत गेलं. आर्द्रा मात्र संथ लयीनं पडल्या. भरपूर पाऊस झाला. रानातील उष्णता निघून गेली. रानं थंडगार झाली. प्राणीमात्रांची मनं थंड झाली. ओढे-नाले एकदा-दोनदा वाहून गेले. माळाला, बांधाला हिरवळ फुटू लागली.''[३३]

## ६.७ समारोप :

अशाप्रकारे 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीमधील कथानक, व्यक्तिरेखन, समाजचित्रण, भाषाशैली व निवेदनशैली या घटकांचा अनेक अंगांनी आपण अभ्यास केला. सदर कादंबरीचा प्रारंभ, मध्य व शेवट अशा विशिष्ट पद्धतीने झालेला आहे. कादंबरीचे कथानक वास्तववादी असले तरी या कादंबरीचे खरे यश त्यांच्या व्यक्तिरेखनात आहे. तसेच तत्कालीन समाजचित्रण कादंबरीत चित्रित झाल्यामुळे आधुनिक समाजजीवन व त्या काळातील समाजजीवन यांच्यामधील बदल दिसून येतो. त्याचबरोबर भाषाशैली व निवेदन शैलीमुळे ही कादंबरी उठावदार व उल्लेखनीय झाल्याचे दिसते. वास्तववादी चरित्रात्मक कादंबरी म्हणून मराठी साहित्यात ही कादंबरी उल्लेखनीय आहे.

यानंतर पुढील प्रकरणात आतापर्यंत झालेल्या सहा प्रकरणांचा आढावा 'उपसंहार' या प्रकरणात घ्यावयाचा आहे.

## संदर्भ


१ यादव आनंद, 'लोकसखा ज्ञानेश्वर' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, द्वितीय आवृत्ती, सप्टेंबर २००६, पृ. क्र. १.

२ तत्रैव, पृ. कृ. ४८०-८१.

३ तत्रैव, पृ. कृ. ४८१.

४ तत्रैव, पृ. क्र. ४७.

५ तत्रैव, पृ. क्र. १६४.

६ तत्रैव, पृ. क्र. ३४०.

७ तत्रैव, पृ. क्र. ४८१.

८ तत्रैव, पृ. क्र. ३५४.

९ तत्रैव, पृ. क्र. १६.

१० तत्रैव,. पृ. क्र. ३५३.

११ तत्रैव: उ.नि. पृ. क्र. २७२.

१२ तत्रैव, पृ. क्र. २७४.

१३ तत्रैव, पृ. क्र. २९१.

१४ तत्रैव, पृ. क्र. ३९९

१५ तत्रैव, पृ. क्र. ४०५.

१६ तत्रैव, पृ. क्र. २५६.

१७ तत्रैव, पृ. क्र. ४४३.

१८ तत्रैव, पृ. क्र. ४३६.

१९ तत्रैव, पृ. क्र. १००.

२० तत्रैव, पृ. क्र. ४४२.

२१ तत्रैव, पृ. क्र. ३१९-२०.

२२ तत्रैव, पृ. क्र. ३८८.

२३ तत्रैव, पृ. क्र. ४५८.

२४ तत्रैव, पृ. क्र. ४१८.

२५ तत्रैव, पृ. क्र. ४४४.

२६ तत्रैव, पृ. क्र. ३४२.

२७ तत्रैव, पृ. क्र. ४२४.

२८ तत्रैव, पृ. क्र. १२६-२७.

२९ तत्रैव, पृ. क्र. ३५१.

३० तत्रैव, पृ. क्र. ३३१.

३१ तत्रैव, पृ. क्र. २११.

३२ तत्रैव, पृ. क्र. ३९०.

३३ तत्रैव, पृ. क्र. ४४८.